५२वा वार्षिक अहवाल
२०२५-२६

रु. ४०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार !




संपदा सहकारी बँक लि.,पुणे


मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, D.I.C. बिल्डिंग,
कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११००२.


www.sampada.bank.in


बँकेच्या मागील पाच वर्षांच्या व्यवसायाचा आलेख


रुपये लाखांत














सन २०२५-२०२६ साठी ऑडिट 'अ' वर्ग प्राप्त

संपदा समाजकल्याण पुरस्कार प्रदान सोहळा



प्रतिमापूजन करताना
श्री. एस. के. जैन, अध्यक्ष, नियामक मंडळ, शि. प्र. मंडळी
व श्री. विनयजी पत्राळे, संस्थापक, भारत भारती



स्व-रूपवर्धिनी संस्थेचे श्री. शिरीष पटवर्धन
मनोगत व्यक्त करताना



प्रमुख अतिथी श्री. एस.के. जैन, अध्यक्ष, नियामक मंडळ,
शिक्षण प्रसारक मंडळी यांचे मार्गदर्शन



प्रमुख वक्ते श्री. विनयजी पत्राळे,
संस्थापक, भारत भारती – मार्गदर्शन करताना



स्व-रूपवर्धिनी संस्थेस संचालक मंडळ सदस्य व मान्यवरांचे हस्ते संपदा समाजकल्याण पुरस्कार प्रदान

वार्षिक सर्वसाधारण सभा २०२५



विषय मांडताना बँकेचे उपाध्यक्ष
सी.ए. श्री. महेश लेले



बँकेचे सभासद व खातेदार श्री. योगेश जकाते
यांचा सत्कार करताना उपाध्यक्ष सी.ए.श्री. महेश लेले
व संचालक सी.ई.श्री. जितेंद्र पैठणकर



बँकेचे सभासद व खातेदार श्री. प्रतापराव देशमुख यांचा
सत्कार करताना व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. सुनील देशपांडे,
संचालक श्री. हरीष अनगोळकर व श्री. देवदत्त बोराळकर



बँकेच्या सभासद व खातेदार सौ. नीलम दळवी यांचा
सत्कार करताना संचालिका सौ. प्रांजली फडणवीस



वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित सभासद व खातेदार



श्रीराम इन्श्युरन्स कंपनी व संपदा सहकारी बँक यांच्यात इन्श्युरन्स व्यवसाय करार प्रसंगी लोगोचे उद्घाटन करताना बँकेचे अध्यक्ष सी.ई. श्री. अश्विनीकुमार उपाध्ये, उपाध्यक्ष सी.ए.श्री. महेश लेले व कंपनीचे अधिकारी

संचालक – कर्मचारी स्नेहमेळावा



प्रतिमापूजन करताना श्री. प्रसेनजीत फडणवीस,
सोबत अध्यक्ष सी.ई. श्री. अश्विनीकुमार उपाध्ये,
उपाध्यक्ष सी.ए.श्री. महेश लेले,
व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष व संचालक श्री. मुकुंद भालेराव



प्रमुख अतिथी, बँक ऑफ महाराष्ट्रचे नवनियुक्त संचालक
श्री. प्रसेनजीत फडणवीस यांचा संचालक मंडळ सदस्यांचे
हस्ते सत्कार



स्नेहमेळाव्यास उपस्थित संचालक व कर्मचारीवर्ग

संचालक – कर्मचारी स्नेहमेळावा



मनोगत व्यक्त करताना
श्री. प्रसेनजीत फडणवीस



सर्वोत्कृष्ट शाखा प्रथम पुरस्कार
चाकण शाखेस प्रदान



सर्वोत्कृष्ट शाखा द्वितीय पुरस्कार
शिरवळ शाखेस प्रदान



सर्वोत्कृष्ट शाखा तृतीय पुरस्कार
कोरेगाव भीमा शाखेस प्रदान

संपदा सहकारी बँक लिमिटेड, पुणे

मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, गणेश रोड, पुणे ४११००२

संचालक मंडळ

(२०२२ - २०२७)

सी.ई. श्री.अश्विनीकुमार पद्माकर उपाध्ये	**अध्यक्ष**
सी.ए. श्री.महेश विष्णू लेले	**उपाध्यक्ष**
श्री. दिलीप रामचंद्र नलावडे	**संचालक**
श्री. मुकुंद भालचंद्र भालेराव	**संचालक**
श्री. देवदत्त दिनकरराव बोराळकर	**संचालक**
श्री. राहूल नेमिचंद बोरा	**संचालक**
सी.ई. श्री. जितेंद्र प्रभाकर पैठणकर	**संचालक**
श्री. अभय अनिलकुमार मिश्रा	**संचालक**
श्री. मल्लिकार्जुन गुंडप्पा सर्जे	**संचालक**
श्री. जगन्नाथ प्रभाकर कुलकर्णी	**संचालक**
सौ. संगीता हेमंतराजे मावळे	**संचालिका**
सौ. प्रांजली प्रसेनजीत फडणवीस	**संचालिका**
श्री. हरीष नागेश अनगोळकर	**संचालक**
श्री. राजाभाऊ रामचंद्र ढोण	**संचालक**
सौ. ज्योती मारुती शिंदे	**संचालिका**
श्री. गिरीश गणेश सरदेशपांडे	**मुख्य कार्यकारी अधिकारी**

संपदा सहकारी बँक लिमिटेड, पुणे

मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, गणेश रोड, पुणे ४११००२

व्यवस्थापन मंडळ

दिनांक २० ऑगस्ट, २०२२ पासून

श्री. मुकुंद भालचंद्र भालेराव	**अध्यक्ष**
श्री. राजाभाऊ रामचंद्र ढोण	**सदस्य**
श्री. हरीष नागेश अनगोळकर	**सदस्य**
डॉ. सुनील उध्दवराव देशपांडे	**सदस्य**
श्री. मंदार मकरंद लेले	**सदस्य**
श्री. राहूल नरहरी गव्हाणे	**सदस्य**
श्री. मनोज बबनराव काळे	**सदस्य**

बँकेचे लेखापरीक्षक

मे. एस.एस.एस.एस. ॲण्ड असोसिएटस्,
चार्टर्ड अकौंटंटस्,
संस्था नोंदणी क्रमांक
१२१७६९डब्ल्यू
(कन्करंट ऑडिटर)

मे. ए.जे. कन्सल्टंटस्
श्री. अभिजीत जोशीराव

(जी.एस.टी. कन्सल्टंट)

मे. सी.एम.आर.एस. ॲण्ड असोसिएटस्, एल.एल.पी.,
चार्टर्ड अकौंटंटस्,
संस्था नोंदणी क्रमांक
१०१६७८डब्ल्यू
(अंतर्गत लेखापरीक्षक)

मे.एस.आर.पंडित ॲण्ड कंपनी,
चार्टर्ड अकौंटंटस्,
संस्था नोंदणी क्रमांक
१०७३०९डब्ल्यू
(वैधानिक लेखापरीक्षक)

संपदा सहकारी बँक लिमिटेड, पुणे

मुख्य कार्यालय :७१७, बुधवार पेठ, गणेश रोड, पुणे ४११ ००२
नोंदणी क्रमांक :पी.एन्.ए./बी.एन्.के./२३१, दिनांक ३१/०५/१९७४
रिझर्व्ह बँक अनुप्राप्ती क्रमांक : यु.बी.डी.एम्.ए.एच्.१६१७ पी, दिनांक ०८/०८/१९९८
दूरध्वनी क्रमांक : ०२०-४०३९४०३८, ४०३९४०३९
E-mail : headoffice@sampadabank.bank.in, Website : www.sampadabank.bank.in

❖ ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ❖
(फक्त सभासदांसाठी)

संपदा सहकारी बँक लि., पुणे या बँकेच्या सर्व सभासद बंधू भगिनींना विनंतीपूर्वक कळविण्यात येत आहे की, बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता, 'गणेश सभागृह', मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे ४११०३० येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती. सभेत खालील विषयांचा विचार केला जाईल व त्यावर निर्णय घेतले जातील.

सभेपुढील विषय

१) दिनांक २८ जून, २०२५ रोजी झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ या सहकारी वर्षातील बँकेच्या कामकाजाच्या मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालाची माहिती घेणे व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले आणि मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले दिनांक ३१/०३/२०२६ अखेरचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद स्वीकृत करणे.
३) वैधानिक लेखापरिक्षकांच्या आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६) मा. संचालक मंडळाने २०२६-२०२७ या सालासाठी सुचविलेले व शिफारस केलेले बँकेच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक संमत करणे व ज्या बाबींवर गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील अंदाजापेक्षा जास्त खर्च झाला आहे, त्या खर्चास मान्यता देणे.(परिशिष्ट क)
७) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या व्यवसायवृध्दी आराखड्याची नोंद घेणे.
८) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडून दिनांक ३१/०३/२०२६ अखेर येणे असलेल्या कर्जाची सहकारी कायदा कलम ७५(२) नुसार माहिती घेणे (परिशिष्ट ब)
९) सन २०२५-२०२६ मध्ये एकरकमी सामोपचार कर्जपरतफेड योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या प्रस्तावांची नोंद घेणे.
१०) म.स.संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार अनुत्पादित कर्जखात्यांची नांवे बाकी वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निरस्त (Write Off) करण्यास मान्यता देणे.
११) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आणि त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेल्या मंजुरीप्रमाणे मे. एस.आर.पंडित ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंटस् यांच्या नियुक्तीची नोंद घेणे.

१२) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणेस व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देण्याबाबत नोंद घेणे.

१३) मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरुन
गिरीश गणेश सरदेशपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : २७ जुलै, २०२६

टीप :

१) गणसंख्येअभावी वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यास, सभा सकाळी ठीक ११.०० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचा विचार होईल व निर्णय घेतले जातील.

२) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून दिनांक ०३/०८/२०२६ पासून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सभासदांनी घेऊन जावी, अशी विनंती आहे.

३) सभेचे कामकाज योग्य वेळेत पूर्ण व्हावे, या दृष्टीने अहवाल व ताळेबंदाविषयी किंवा नोटीशीतील विषयासंबंधी **सभासदांना काही माहिती व प्रश्न विचारावयाचे असल्यास, त्यांनी गुरुवार, दिनांक १३/०८/२०२६ रोजी संध्याकाळी ६.३० वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लिखित स्वरुपात आणून द्यावेत, म्हणजे माहिती देणे सोयीचे होईल.**

४) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेतील विषयांसंबंधीची सर्व अनुषंगिक कागदपत्रे, बँकेच्या मुख्य कार्यालयात, बँकेच्या वेळांत सभासदांना पाहावयास मिळतील.

५) बँकेचा संक्षिप्त ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईटवर दिनांक २७/०७/२०२६ पासून उपलब्ध आहे.

६) सर्व सभासदांना विनंती की, त्यांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्त्याची नोंद बँकेच्या दप्तरी करण्यासाठी बँकेशी संपर्क साधावा.

७) ज्या सभासदांनी आपली अद्ययावत के.वाय.सी. कागदपत्रे आणि माहिती बँकेत सादर केली नसतील, त्यांनी ती आपल्या जवळच्या शाखेत त्वरीत सादर करावीत, ही विनंती.

८) **ज्या सभासदांच्या पाल्यांना इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत ८५ % पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत, तसेच, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविले आहे, अशा सभासद व त्यांच्या पाल्यांची माहिती दिनांक १३/०८/२०२६ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात सादर करावी, म्हणजे त्यांचे वार्षिक सर्वसाधारण सभेत कौतुक करणे शक्य होईल.**

९) ज्या सभासदांना त्यांचे ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक बँकेकडे ई-मेलव्दारे रजिस्टर करावयाचे असतील, त्यांनी फक्त headoffice@sampada.bank.in या ई-मेल आयडी वर दिनांक १३/०८/२०२६ पर्यंत सदर माहिती पाठवावी.

१०) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीस अधीन राहून लाभांश जाहीर झाल्यास, तो जमा करण्यासाठी आपल्या बँकेच्या कोणत्याही शाखेत बचत खाते उघडावे, म्हणजे लाभांश रक्कम त्वरित जमा करणे शक्य होईल.

अध्यक्षांचे मनोगत

सस्नेह नमस्कार !

आर्थिक वर्ष २०२५–२०२६ ची बँकेची आर्थिक स्थिती आपल्यासमोर मांडताना विशेष आनंद होत आहे. यावर्षी बँकेने व्यवसायाचा रुपये ४०० कोटींचा टप्पा पार केल्याबद्दल प्रथमतः बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक, तसेच, बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकारी सर्व संचालक यांचे मनःपूर्वक अभिनंदन ! बँक यावर्षी ५३ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. मागील काही दशकांत बँकेपुढे आलेल्या सर्व अडचणींवर मात करुन, व्यवसायाचा हा टप्पा पूर्ण झाला, हे विशेष !

या अहवालामध्ये सादर केलेली बँकेची तुलनात्मक स्थिती, यावर्षीची व्यवसायवाढ यांचा विचार करतां बँक भविष्यात अधिक गतीने प्रगती करेल असा माझा विश्वास आहे. यावर्षी बँकेचा व्यवसायवाढीचा दर १४.८७% होता. बँकिंग क्षेत्रातील स्पर्धेचा विचार करता, हा दर निश्चितच समाधानकारक आहे. या क्षेत्रावर प्रभाव टाकणा–या सकारात्मक आणि नकारात्मक बाबी बँकेची व्यवसायवाढ करीत असतांना, बँकेच्या आर्थिक स्थितीवर थेट परिणाम करतात, याचा अनुभव यावर्षी सर्वच बँकांना आला आहे. वर्षभर चांगला व्यवसाय करुन सुध्दा शेवटच्या तिमाहीत सुरु झालेल्या आखाती युध्दामुळे निव्वळ नफ्यावर विपरित परिणाम झाला आहे.

भारतीय अर्थव्यवस्था –

डिसेंबर, २०२५ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात असतांना अमेरिकेने भारताच्या आयात–निर्यातीवर आणलेली बंधने, अवास्तव टेरीफ आकारणी यांमुळे सुरुवातीचा काही काळ अर्थव्यवस्थेला अडथळा निर्माण झाला. त्यातच, शेवटच्या तिमाहीत वर उल्लेख केल्याप्रमाणे आखाती युध्द सुरु झाल्याने विकासाला खीळ बसली. परंतु, केंद्र सरकारच्या कणखर धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा सुस्थितीत आणि प्रगतीकडे वाटचाल करणारी आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अर्थतज्ज्ञ / संस्था भारताची अर्थव्यवस्था जगातील अन्य देशाच्या तुलनेत सर्वात जलद गतीने वृध्दी होणारी (Fastest growing economy in the world) अर्थव्यवस्था असल्याचे ठामपणे म्हटले आहे. मूलभूत सुविधांमध्ये सातत्याने होणारी प्रगती, स्टार्ट–अपच्या माध्यमातून उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान या क्षेत्रात मिळत असलेली चालना यामुळे देशांतर्गत गुंतवणुकीबरोबर परदेशी गुंतवणूकसुध्दा वाढत आहे. संरक्षण क्षेत्रात आपला देश आत्मनिर्भर होत आहे, ही समाधानाची बाब आहे. भारताच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि भारतामध्ये तयार होणारे विविध उत्पादन याला आंतरराष्ट्रीय बाजार मिळविण्यासाठी केंद्र सरकार अनेक देशांशी विविध करार करीत आहे, याचा सकारात्मक परिणाम भविष्यात होणार आहे. जगामध्ये युध्दसदृश स्थिती असूनसुध्दा देशाचा विकासदर, परकीय गंगाजळी यांवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही.

बँकिंग क्षेत्र –

एकूण देशाची अर्थव्यवस्था प्रतिवर्षी अधिकाधिक सुदृढ होत आहे, त्यामुळे स्वाभाविकच बँकिंग क्षेत्रसुध्दा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे एकूण अर्थव्यवस्थेवर असलेले नियंत्रण बँकांच्या कामकाजात आणि नियमांत होत असलेले बदल जरी जाचक वाटत असले, तरी बँकिंग क्षेत्राच्या स्थैर्यासाठी ते आवश्यक आहेत. नुकत्याच प्रसारित झालेल्या आकडेवारीनुसार, राष्ट्रीयीकृत बँकांकडून केंद्रसरकारला यावर्षी भरघोस लाभांश मिळणार आहे. तसेच, सर्वच प्रकारच्या बँकांच्या सभासदांनाही लाभांश मिळणार आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्र –

सहकारी बँका अधिक सक्षमपणे सुरु राहाव्यात आणि वाढाव्यात यासाठी रिझर्व्ह बँक विशेष लक्ष देत आहे. सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने पारित केलेली विविध परिपत्रके, रिझर्व्ह बँकेची तपासणी यामध्ये गेल्या काही वर्षांत आमूलाग्र बदल झाला आहे. सहकारी बँकिंग क्षेत्र सक्षम व्हावे, यासाठी रिझर्व्ह बँकेच्या प्रयत्नांना सर्वच सहकारी बँकांचे संचालक मंडळ सकारात्मक प्रतिसाद देत आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, मनुष्यबळ, इत्यादी विषयांची अंमलबजावणी करतांना, संचालक मंडळाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. आता सहकारी बँकांची सर्व स्तरावर, सर्व बँकांशी स्पर्धा सुरु झाल्याने या स्पर्धेत टिकून राहावयाचे असेल तर, काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत. तसेच, व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोनसुध्दा बदलावा लागणार आहे, याची कल्पना आता संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांना आली आहे. सहकारी बँकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी अंब्रेला ऑर्गनायझेशनची निर्मिती झाली असून, पुढील काही काळात ही ऑर्गनायझेशन तंत्रज्ञान, मनुष्यबळ, गुंतवणूक, इत्यादी विषयांमध्ये सहकारी बँकांना मदत करणार आहे. सन २०२५ अखेरच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, सहकारी बँकांची व्यवसायवाढ समाधानकारक आहे.

बँकेची आर्थिक स्थिती –

मागील २–३ वर्षांत बँकेने व्यवसायवाढीचा दर १० ते १५ % ठेवण्यात यश मिळविले आहे. यावर्षी चांगला व्यवसाय करुनसुध्दा गुंतवणुकीपोटी ज्यादा तरतूद करावी लागल्याने नफा क्षमतेवर परिणाम झाला आहे. तसेच, एनपीए मध्ये सुध्दा वाढ झाली आहे. परंतु, सर्व कर्जे सुरक्षित असून, त्याला आवश्यक ते तारण घेतलेले आहे. सदर कर्जदारांविरुध्द त्वरीत कारवाई सुरु केली असून, नजीकच्या काळात सर्व थकीत मोठी कर्जे वसूल होतील, अशी खात्री आहे. व्यवसायवाढीचा दर चांगला राखल्याने बँकेच्या भागभांडवलामधील वाढही समाधानकारक असून, सभासदांच्या बँकेवरील विश्वासाचे निदर्शक आहे. बँकेच्या आर्थिक सक्षमतेसाठी असणारे CRAR, Net NPA, Net Profit, Net Worth, इत्यादी महत्त्वाचे निकष पूर्ण केले आहेत. आपण यावर्षीचा अहवाल सविस्तरपणे वाचल्यावर आपल्या ही गोष्ट लक्षात येईल. बँकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे आणि माझ्या सहकारी संचालकांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले आहे. सन २०२६–२०२७ साठी बँकेने रुपये ५१५ कोटींचे व्यवसायवाढीचे उद्दिष्ट ठेवले असून, ते पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील राहू.

महिला सक्षमीकरण –

गेल्या काही वर्षात, केंद्र सरकार महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना आणि कायदे जाहीर करीत आहे. यायोगे, देशातील सर्व महिलांचा सर्वच क्षेत्रात सहभाग वाढत आहे. महिलांना मूलभूत सुविधा देण्यापासून ते त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचे प्रयत्न सर्व स्तरावरुन होत आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या या प्रयत्नांना प्रतिसाद देणे सहकारी बँकांचे सुध्दा कर्तव्य आहे, या जाणीवेतून बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षापासून महिलांसाठी आत्मनिर्भर कर्जयोजना सुरु केली आहे. या आर्थिक वर्षात या योजनेस खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. ही योजना बँकेच्या कार्यक्षेत्रात अधिकाधिक पोहोचावी, यासाठी, सर्व अधिकारी आणि कर्मचारी प्रयत्न करीत आहेत. या योजनेअंतर्गत केलेल्या व्यवसायाची आकडेवारी पुढे अहवालात दिली आहे. सन २०२६–२०२७ अखेर ५०० महिलांना या योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य करण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे.

तंत्रज्ञान –

बँकिंग क्षेत्रातील स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही आवश्यक बाब बनली आहे. आपल्या बँकेने अद्ययावत सेवा Digital Platform वर उपलब्ध केल्या आहेत. Cyber Security Framework अंतर्गत आपला Data हा Cloud Network वर सुरक्षित आहे. रिझर्व्ह बँकेच्या तंत्रज्ञानविषयक सर्व निकषांचे पालन करण्याचा प्रयत्न बँक सतत करीत आहे. बँकेने ग्राहकांसाठी सुरु केलेल्या UPI सेवेला ग्राहकांचा भरघोस पाठिंबा मिळत आहे.

आव्हाने –

सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने या आर्थिक वर्षात काढलेली सर्व परिपत्रके भविष्यात सहकारी बँकिंग क्षेत्रात मोठे बदल घडविणारी आहेत. या परिपत्रकांचा अभ्यास करुन, मनुष्यबळ व्यवस्थापन, तंत्रज्ञान, जोखीम व्यवस्थापन, अशा आव्हानात्मक मुद्द्यांवर निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. यासाठी, संचालक मंडळ आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या दीर्घ बैठका आयोजित केल्या जात आहेत. आवश्यकतेनुसार प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे लागणार आहे. किमान खर्च व अधिकाधिक उत्पन्न मिळविण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करीत आहोत. येणारा काळ Digital Banking च्या दिशेने जाणार असून, यासाठी सर्व पातळ्यांवर बँकेने सुसज्ज राहणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांचे सतत प्रशिक्षण, तंत्रज्ञान विकासासाठी निधी नियोजन, व्यावसायिक दृष्टीकोन ठेऊन तंत्रज्ञानाभिमुख ग्राहकसेवा यांकडे सर्वच बँकांनी धोरण ठरविणे आवश्यक आहे.

समारोप –

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षीची आर्थिक स्थिती आणखी भक्कम होण्यासाठी बँकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमाबद्दल सर्व कर्मचारी निश्चितच कौतुकास पात्र आहेत. वैधानिक लेखापरिक्षक सी.ए. सुधीर पंडित, अंतर्गत लेखापरिक्षक सी.ए. प्रसाद सराफ, कन्करंट ऑडिटर सी.ए. सौरभ गोडबोले आणि त्यांचे सहकारी, तसेच, बँकेचे टॅक्स आणि सिस्टीम सल्लागार या सर्वांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार ! रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सर्व अधिकारी यांनाही मनःपूर्वक धन्यवाद! आपल्या भक्कम पाठिंब्याच्या आणि सहकार्याच्या बळावर येणाऱ्या काळात बँकेची अशीच उत्तरोत्तर प्रगती साधण्यासाठी संचालक मंडळ सदस्य आणि सर्व कर्मचारी प्रयत्नशील राहू.

धन्यवाद !

आपला विनित,

अश्विनीकुमार उपाध्ये

बँकेच्या कामकाजाचा अहवाल

(आर्थिक वर्ष २०२५-२०२६)

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

सस्नेह नमस्कार !

बँकेच्या दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर पूर्ण झालेल्या ५२ व्या वर्षातील कामकाजाचा अहवाल आणि दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेरचे मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासून प्रमाणित केलेले बँकेचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद, लेखापरीक्षण अहवाल आणि मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले बँकेच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक, मा. संचालक मंडळाच्या वतीने मान्यता व मंजुरीसाठी आपणांसमोर सादर करीत आहे.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात बँकेची व्यावसायिक उलाढाल रुपये ३६०.०३ कोटींवरुन, रुपये ४१३.५६ कोटींपर्यंत पोहोचली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये रुपये ५३.५३ कोटींची वाढ झाली आहे. टक्केवारीमध्ये हे प्रमाण १४.८७% इतके आहे. बँकिंग व्यवसायाची प्रगती दर्शविणारे जे महत्त्वाचे मापदंड आहेत, त्या प्रत्येक बाबींत बँकेने गेल्या पाच वर्षांत समाधानकारक प्रगती केली असून, मागील पाच वर्षांचा महत्त्वाच्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे :

रक्कम रुपये लाखांत

क्र.	तपशील	मार्च, २०२२	मार्च, २०२३	मार्च, २०२४	मार्च, २०२५	मार्च, २०२६
१	सभासद संख्या	१२०८७	१२३६१	१२८६९	१३२७३	१३६३३
२	वसूल भागभांडवल	४७१.९७	५०५.९३	५६०.६१	५९२.५२	६३८.५४
३	ठेवी	१६१३०.७३	१७०१८.०८	१८७७६.९९	२१४९५.५८	२५०७२.९९
४	कर्जे	९८६०.१४	१०१०८.४८	१२३२२.३१	१४५०७.९०	१६२८३.३७
५	एकूण व्यवसाय	२५९९०.८७	२७१२६.५६	३१०९९.३०	३६००३.४८	४१३५६.३६
६	निव्वळ नफा	१६.२९	१३२.५७	१५०.५८	१५४.१४	५०.८०
७	खेळते भांडवल	१९६४०.२४	२०९१५.६८	२३०१३.९६	२५६०४.०२	२८९०१.६०
८	कर्जाचे ठेवीशी प्रमाण	६१.१३%	५९.४०%	६५.६२%	६७.४९%	६४.९४%
९	प्रतिसेवक उत्पादकता	३९३.८०	४०४.८७	४२६.०२	४५०.०४	५३०.२१
१०	एकूण एन्.पी.ए.	१५५२.६६	१०२०.९१	८०३.०२	९१३.४०	१२३१.३२
११	एन्.पी.ए. चे कर्जाशी प्रमाण	१५.७५%	१०.१०%	६.५२%	६.३०%	७.५६%
१२	निव्वळ एन्.पी.ए.	६.०२%	०.००%	०.००%	०.००	२.४१%
१३	भांडवल पर्याप्तता गुणोत्तर	१५.९५%	१६.७०%	१६.२५%	१५.७९%	१५.५३%
१४	ऑडिट वर्ग	ब	अ	अ	अ	अ

व्यवस्थापन मंडळ :

व्यवस्थापन मंडळाच्या नियमित बैठका होत आहेत. अहवाल सालात व्यवस्थापन मंडळाच्या २४ बैठका झाल्या आहेत. व्यवसायवाढीच्या दृष्टीने व्यवस्थापन मंडळाकडून चांगले मार्गदर्शन मिळत आहे. व्यवस्थापन मंडळाने त्यांच्या सभेमध्ये नोंदविलेली निरीक्षणे आणि सूचनांची माहिती संचालक मंडळास नियमितपणे देण्यात येते. बँकेच्या विविध विषयांवर निर्णय घेतांना या निरीक्षणे आणि सूचनांचा विचार केला जातो.

सभासद व भागभांडवल:

अहवाल सालात, सभासदांच्या संख्येमध्ये ३६० सभासदांची वाढ झाली असून, भागभांडवलात रुपये ४६.०२ लाख इतकी नक्त वाढ झाली आहे. टक्केवारीनुसार हे प्रमाण ७.७७% इतके आहे. अहवाल सालात कर्जदार संख्या आणि कर्ज रक्कम यांत वाढ झाल्यामुळे तसेच, मागील वर्षीच्या तुलनेत कमी सभासदांनी राजीनामे दिल्यामुळे सभासदांच्या संख्येत आणि भागभांडवलातही चांगली वाढ दिसत आहे. बँकेने अनेक वेळा पत्रव्यवहार करुनसुध्दा जुन्या सभासदांनी KYC पूर्तता अद्याप केलेली नाही. भागभांडवलातील वाढीमुळे CRAR, विविध Exposure Limits वाढणेसाठी झाला आहे.

ठेवी:

अहवाल सालात ठेवींमध्ये रुपये ३५७७.४१ लाखांची वाढ झाली असून टक्केवारीमध्ये हे प्रमाण १६.६४% इतके आहे. ठेवीदारांच्या ठेवीस संरक्षण मिळणेसाठी ठेव विमा योजनेअंतर्गत सप्टेंबर, २०२६ अखेरच्या सहामाहीचे विमा शुल्क रक्कम रुपये १३,६७,१६८.०४, दिनांक ३०/०५/२०२६ रोजी DICGC कडे अदा केले आहे. बँकेच्या व्यवसायवाढीत ठेव संकलन हा प्रमुख घटक असला तरी, प्रत्येक

ठेवीचा देय कालावधीचा अभ्यास करुन त्यानुसार ठेवयोजनांचा कालावधी ठरविला जातो. यासाठी ALCO ही बँकेतील अधिकाऱ्यांची एक समिती आहे. ही समिती मा. संचालक मंडळास ठेवीचा प्रवाह, त्याचा कालावधी, या ठेवींचा कर्ज आणि गुंतवणुकीसाठी उपयोग केल्यामुळे कर्ज आणि गुंतवणुकीचा परतफेडीचा कालावधी यांबाबतचा अहवाल सादर करते. याचा आणि बँकिंग क्षेत्रातील ठेवींवरील व्याजदरांबाबत सातत्याने होत असलेले चढउतार व आपल्या बँकेच्या उत्पन्न व खर्चाचा नियमित आढावा घेऊन संचालक मंडळ ठेवींवरील व्याजदर बदलांबाबत योग्य ते निर्णय घेते. मागील काही वर्षांत बचत व चालू ठेवींमध्ये वाढ करण्याचा बँक प्रयत्न करीत आहे. यावर्षी या ठेवींचे एकूण ठेवींशी प्रमाण ३०.६०% आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षीसुध्दा ठेवींमध्ये वाढ दिसत आहे. ठेवीच्या प्रकारानुसार मागील दोन वर्षांची तुलनात्मक आकडेवारी पुढीलप्रमाणे :

(रक्कम रुपये लाखांत)

क्र.	ठेव प्रकार	मार्च, २०२५	एकूण ठेवींशी शेकडा प्रमाण	मार्च, २०२६	एकूण ठेवींशी शेकडा प्रमाण
१	चालू ठेवी	१६०५.४०	७.४७%	२४१३.१०	९.६२%
२	बचत ठेवी	४६८१.२३	२१.७८%	५२५८.५८	२०.९७%
३	मुदत ठेवी	१५२०८.९५	७०.७५%	१७४०१.३१	६९.४०%
	एकूण ठेवी	**२१४९५.५८**		**२५०७२.९९**	

कर्जे:

अहवाल सालात बँकेने १७४६ कर्जदार सभासदांना प्रत्यक्ष कर्ज वितरण आणि नूतनीकरण रुपये ८३५२.५८ लाख इतके केले असून, वर्षभरातील झालेली वसुली रुपये ६५७७.११ लाख धरता, कर्ज व्यवहारांमध्ये रुपये १७७५.४७ लाख इतकी वाढ झाली आहे. टक्केवारीमध्ये हे प्रमाण १२.२४% इतके आहे. कर्जदारांना कर्जवाटप करतांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कर्जवितरणासाठीचे सर्व निकष तंतोतंत पाळून, कर्जव्यवसाय वाढविण्यात बँकेला निश्चित यश मिळाले आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रात वाटप केलेल्या कर्जाचे एकूण कर्जाशी सरासरी असलेले प्रमाण हे अनुक्रमे ६५.५५% व १२.०७% आहे. सदर प्रमाण राखत असताना, नेहमीप्रमाणेच याही अहवाल वर्षात बँकेने छोटे उद्योजक, लघुउद्योजक, व्यापारी, दुकानदार, व्यावसायिक, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, प्रोफेशनल्स्, नोकरदार सभासद, इ. ना कर्जवाटप करून त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यास हातभार लावलेला आहे. यावर्षी बँकेने सुमारे २०० महिलांना आत्मनिर्भर कर्जयोजनेअंतर्गत कर्जवाटप केले आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. कर्जप्रकारानुसार मागील दोन वर्षांची तुलनात्मक आकडेवारी पुढीलप्रमाणे :

(रक्कम रुपये लाखांत)

क्र.	कर्ज प्रकार	मार्च, २०२५	एकूण कर्जांशी शेकडा प्रमाण	मार्च, २०२६	एकूण कर्जांशी शेकडा प्रमाण
१	कॅश क्रेडिट व ओव्हरड्राफ्ट	१९७८.६७	१३.६४%	१५६०.०८	९.५८%
२	विनातारण कर्जे	१२९०.८७	८.९०%	१४७५.३५	९.०६%
३	नजरगहाण कर्जे	१९०७.०७	१३.१४%	२२२७.४३	१३.६८%
४	गृह कर्जे	१९२८.९८	१३.२९%	२१०३.५६	१२.९२%
५	सोने तारण कर्जे	१००५.२४	६.९३%	१५३०.०५	९.४०%
६	ठेव व अन्य तारण कर्जे	१००५.१०	६.९३%	१४३३.५०	८.८०%
७	अन्य मुदत कर्जे	५३९१.९७	३७.१७%	५९५३.४०	३६.५६%
	एकूण कर्जे	**१४५०७.९०**		**१६२८३.३७**	

कर्जमालमत्तेचे व्यवस्थापन :

१. दिनांक ३१/०३/२०२६ अखेर एन्.पी.ए.मध्ये रक्कम रुपये ३१७.९२ लाखांनी वाढ झाली आहे. यावर्षी नव्याने एन.पी.ए. झालेल्या कर्जदारांविरुध्द वसुलीसाठी त्वरीत कारवाई सुरु केली आहे. काही कर्जदारांच्या मालमत्ता विक्रीची प्रक्रिया सुरु असून दिनांक ३१ मार्च, २०२७ पूर्वी एन.पी.ए. कमी होऊन निव्वळ एन्पीए चे प्रमाण ०% होईल असा अंदाज आहे. अहवाल सालात मागील वर्षीपेक्षा ढोबळ एन्.पी.ए. च्या प्रमाणामध्ये वाढ झाली असून, ते प्रमाण यावर्षी ७.५६% इतके आहे. यावर्षी मागील वर्षीच्या तुलनेत एनपीए खात्यांची संख्या कमी करण्यात यश मिळाले आहे. परंतु, एनपीए रकमेमध्ये मात्र वाढ झाली आहे. ढोबळ एन.पी.ए. मध्ये वाढ झालेली असूनही, निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार ३% पेक्षा कमी म्हणजेच २.४१% राखण्यात यश आले आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार एन्.पी.ए.साठी सर्व आवश्यक तरतुदी बँकेने केल्या आहेत.

२. यापूर्वी निरस्त केलेल्या खात्यांमध्ये वसुलीचे प्रयत्न सुरु असून दिनांक ३१/०३/२०२६ अखेर निरस्त खात्यांमध्ये रुपये ६५,९५२/- इतकी रक्कम वसूल झाली आहे. यावर्षीसुध्दा वसुलीची शक्यता कमी असलेल्या आणि जुन्या खात्यांपैकी १४ खाती रुपये

२४.५३ लाख निरस्त करण्याची शिफारस करीत आहोत. यासंदर्भात वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणपत्र दिले आहे. सदर विषय आपल्या मंजुरीकरीता मांडीत आहोत.

गुंतवणूक:

कर्ज विभागाबरोबरच बँकेच्या उत्पन्नामध्ये भर घालणारा विभाग म्हणजे गुंतवणूक विभाग. नवीन कर्जदारांना कर्ज वितरण करण्याबरोबरच शिल्लक रकमांची गुंतवणूक नियोजनबध्द केल्याने मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी रूपये १११.५४ लाखांचे ज्यादा उत्पन्न मिळाले आहे. तरीसुध्दा आखाती देशांमधील युध्दाचा विपरित परिणाम सरकारी रोख्यांच्या किंमतीवर झाल्यामुळे बँकेच्या मिळालेल्या एकूण उत्पन्नातील सुमारे १.२७ कोटींची तरतूद घसारा म्हणून करावी लागली, त्यामुळे बँकेच्या निव्वळ उत्पन्नावर परिणाम झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार गुंतवणुकीसाठी सर्व आवश्यक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

भांडवल पर्याप्तता:

रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रण पध्दतीनुसार, बँकांचे आर्थिक स्थैर्य भांडवल पर्याप्ततेवर तपासले जाते. रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण किमान १२.००% असणे बंधनकारक आहे. मागील वर्षी बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १५.७९% इतके होते. यावर्षी हे प्रमाण १५.५३% इतके आहे. भांडवल पर्याप्ततेचे हे प्रमाण बँकेचा आर्थिक पाया भक्कम असल्याचे निदर्शक आहे.

रिझर्व्ह बँकेचे निकष :

रिझर्व्ह बँक दरवर्षी विविध परिपत्रकान्वये बँकेच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवते. तसेच, प्रत्येक वर्षाच्या अखेरीस बँकेच्या लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद, नफा तोटा पत्रक आणि अन्य कागदपत्रांनुसार प्रत्येक बँकेने ECBA (Eligibility Criteria for Business Authorisation) या परिपत्रकाची पूर्तता करणेसाठी सक्षम बँकेसाठी, असलेले निकष संचालक मंडळाने प्रमाणित करणे बंधनकारक केले आहे. संचालक मंडळाने दिनांक २२ जून, २०२६ रोजीच्या सभेमध्ये सदर निकषांनुसार बँकेची स्थिती प्रमाणित केली आहे.

आयकर विभाग :

बँकेने सन २०२५-२०२६ अखेर झालेल्या नफ्याचा विचार करुन आयकरासाठी रुपये ४.८० लाखाची तरतूद केली आहे.

लाभांश :

आर्थिकदृष्ट्या सक्षम बँकेसाठी असलेले रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सर्व निकष यावर्षीही पूर्ण केले आहेत. अहवाल सालात बँकेच्या सर्व तरतुदी पूर्ण केल्यानंतर आणि शिल्लक नफ्यातून नियमानुसार करावयाच्या तरतुदी याचा विचार करुन सन २०२५-२०२६ साठी ३% लाभांशाची शिफारस करीत आहे.

नफा विभागणी :

बँकेस या वर्षी तरतूदपूर्व रक्कम रूपये २०२.३७ लाख एवढा नफा झालेला आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तरतुदी, आयकर, इ. साठी रुपये १५१.५७ लाखांच्या तरतूदी केल्यानंतर (नफा-तोटा पत्रकातील परिशिष्ट ६ नुसार), या वर्षी रक्कम रुपये ५०.८० लाख इतका नफा झाला आहे. गतवर्षीचा शिल्लक नफा रक्कम रुपये ०.२९ लाख जमेस धरता, यावर्षी नफा विभागणीसाठी निव्वळ नफा रुपये ५१.०९ लाख इतका उपलब्ध आहे. सदर नफ्याचे विभागणीस मा. संचालक मंडळाने दिनांक २२/०६/२०२६ रोजीच्या सभेत शिफारस केली असून, मा. सभासदांनी त्यास मंजुरी द्यावी, ही विनंती.

तपशील		रक्कम रुपयांत
१.	राखीव निधी	१२,७०,२००.००
२.	रोखे अवमूल्यन निवारण निधी	२,००,१४५.००
३.	इमारत निधी	१८,२५,०००.००
४.	लाभांश तरतूद @ ३.०० % प्रो रेटाप्रमाणे	१७,८५,४१४.००
५.	शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग	२८,४३७.३६
एकूण		**५१,०९,१९६.३६**

संचालक सभा / व्यवस्थापन मंडळ / उपसमित्या कामकाज :

अहवाल सालात संचालक मंडळ व उपसमित्यांच्या खालीलप्रमाणे बैठका झाल्या.

संचालक मंडळ	२५	कर्जवसुली समिती	१०	भाग समिती	२४
व्यवस्थापन मंडळ	२४	ALCO समिती	४	KYC समिती	४
कार्यकारी (Executive) समिती	७	संगणक व्यवस्थापन समिती	८	एकरकमी सामोपचार कर्ज परतफेड समिती	१४
कर्ज समिती	२८	गुंतवणूक समिती	४	Risk Management Committee	३
वार्षिक सर्वसाधारण सभा	१	ग्राहक सेवा समिती	४	Committee to monitor & follow up Frauds	३
ऑडिट समिती	५	शाखा समिती	१५	विशाखा समिती	३

वरील सर्व बैठकांना संचालकांची उपस्थिती समाधानकारक होती.

एकरकमी सामोपचार कर्ज परतफेड योजनेचा तपशील :

महाराष्ट्र राज्य सहकार व वस्त्रोद्योग खात्याकडून बँकेस प्राप्त झालेल्या एकरकमी सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत बँकेतील एन.पी.ए. खात्यांमधील काही कर्जदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. त्या संबंधीचा तपशील खालीलप्रमाणे असून त्याची सभासदांनी नोंद घ्यावी.

बँकेकडे मंजुरीसाठी आलेली प्रकरणे – ३५, मंजूर झालेली प्रकरणे – ३५, पैकी रद्द केलेली प्रकरणे – ६

रक्कम लाखांत

		तपशील	रक्कम
	१	संशयित क्रमांक १ पर्यंत मुद्दल	२६६.२९
(+)	२	संशयित क्रमांक १ पर्यंत व्याज	७.३३
(+)	३	संशयित क्रमांक १ पासून सवलतीच्या ६% दराने व्याज	४७.४९
(+)	४	जाहिरात खर्च	११.४१
(=)	५	वसूलपात्र रक्कम	३३२.५२
(–)	६	संशयित क्रमांक १ नंतर आलेली वसूली	१२४.८८
(=)	७	तडजोडपात्र रक्कम	२०७.६४
(–)	८	रद्द केलेली प्रकरणे (६)	५.१५
(=)	९	वसूलपात्र रक्कम	२०२.४९
	१०	सूट	१२५.५९

टीप – एकूण ३५ मंजूर प्रकरणांपैकी ६ प्रकरणे रद्द करण्यात आली. थकबाकीदारांना या योजनेअंतर्गत मंजुरी दिल्यानंतर, त्यांनी या योजनेमधील अटी व शर्तींची पूर्तता न केल्याने सदर प्रकरणे रद्द करण्यात आली आहेत.

उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक :

सन २०२६–२०२७ सालासाठी मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले अंदाजपत्रक परिशिष्ट 'क' मध्ये दिलेले आहे. सन २०२६–२०२७ सालात बँकेचे एकूण अपेक्षित उत्पन्न रूपये २६६०.०० लाख व अपेक्षित खर्च रूपये २३९४.०० लाख असून आयकरासाठीची रुपये ६१.०० लाखांची आणि इतर तरतुदी केल्यानंतर अपेक्षित निव्वळ नफा रुपये २६६.०० लाख इतका आहे. गतवर्षी ज्या बाबींवर जादा खर्च झाला आहे, त्यास कृपया मंजुरी दयावी.

तपासणी :

१. दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते दिनांक ३१ मार्च, २०२६ या मुदतीचे कन्करंट ऑडिट मे. एस.एस.एस.एस. ॲण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटंटस् यांनी तर अंतर्गत लेखापरीक्षण मे. सी.एम.आर.एस. ॲड असोसिएटस्, एल.एल.पी., चार्टर्ड अकौंटंटस् यांनी केले.

२. वैधानिक लेखापरीक्षण मे. एस.आर.पंडित ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् यांनी केले. त्यांनी बँकेच्या दैनंदिन कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले असून, बँकेच्या एकूण एन.पी.ए. पैकी मोठी रक्कम ठराविक मोठ्या थकबाकीदारांकडून येणे आहे. त्याच्या वसुलीसाठी मा. संचालक मंडळाने त्वरीत पावले उचलावीत व अधिकाधिक वसुली करण्यासाठी आवश्यक सर्व प्रयत्न करावेत, अशी सूचना केली आहे.

शाखानिहाय स्थिती :

सर्व शाखांनी मागील वर्षाच्या तुलनेत चांगला व्यवसाय केला असून, ठेवी व कर्जांची शाखानिहाय तुलनात्मक स्थिती पुढीलप्रमाणे :

(रक्कम रुपये लाखांत)

शाखा	दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर ठेवी	वाढ /घट	दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर ठेवी	वाढ /घट (% मध्ये)
बुधवार पेठ शाखा	७००३.१३	५५५.०३	७५५८.१६	७.९३%
चाकण शाखा	३४०९.३७	८४३.४७	४२५२.८४	२४.७४%
सुभाष नगर शाखा	२६९४.८०	३९५.१९	३०८९.९९	१४.६६%
कर्वे रोड शाखा	१७१३.९७	५२४.६२	२२३८.५९	३०.६१%
धायरी शाखा	३५१३.०८	१०१५.१४	४५२८.२२	२८.९०%
कोरेगांव भीमा	९७०.८८	७९.९५	१०५०.८३	८.२३%
शिरवळ	८२८.७६	४९७.०८	१३२५.८४	५९.९८%
कात्रज कोंढवा रोड	१३६१.५९	-३३३.०७	१०२८.५२	-२४.४६%
एकूण ठेवी	**२१४९५.५८**	**३५७७.४१**	**२५०७२.९९**	**१६.६४%**

(रक्कम रुपये लाखांत)

शाखा	दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर कर्जे	वाढ /घट	दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर कर्जे	वाढ /घट (% मध्ये)
बुधवार पेठ शाखा	४३०४.४९	४३१.६६	४७३६.१५	१०.०३%
चाकण शाखा	२३३८.३४	७५२.४५	३०९०.७९	३२.१८%
सुभाष नगर शाखा	१८६८.२२	२७१.२४	२१३९.४६	१४.५२%
कर्वे रोड शाखा	९५६.५२	१२७.७२	१०८४.२४	१३.३५%
धायरी शाखा	१५७७.६७	-४४.४०	१५३३.२७	-२.८१%
कोरेगांव भीमा	१२८८.९३	३१९.७०	१६०८.६३	२४.८०%
शिरवळ	९१५.८१	४६५.७७	१३८१.५८	५०.८६%
कात्रज कोंढवा रोड	१२५७.९२	-५४८.६७	७०९.२५	-४३.६२%
एकूण कर्जे	**१४५०७.९०**	**१७७५.४७**	**१६२८३.३७**	**१२.२४%**

तुलनात्मक आर्थिक स्थिती (टक्केवारी)

क्र.	तपशील	२०२१-२०२२	२०२२-२०२३	२०२३-२०२४	२०२४-२०२५	२०२५-२०२६
१	कर्जाचे ठेवीशी प्रमाण	६१.१३%	५९.४०%	६५.६२%	६७.४९%	६४.९४%
२	एकूण उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	८.८५%	७.८२%	७.९५%	८.१५%	८.१६%
३	व्याजापोटीच्या उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	७.३४%	६.९५%	६.८८%	७.०५%	७.३८%
४	इतर उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१.५२%	०.८७%	१.०७%	१.१०%	०.७६%
५	कर्मचारी वेतनाचे एकूण उत्पन्नाशी प्रमाण	१९.२०%	१९.१४%	२३.३४%	१९.५८%	१८.९८%
६	कर्मचारी वेतनाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१.७०%	१.५०%	१.८६%	१.६०%	१.५५%
७	एकूण ठेवींचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	८२.१३%	८१.३७%	८१.५९%	८३.९५%	८९.९२%
८	निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	०.०८%	०.६३%	०.६५%	०.६०%	०.१८%
९	थकबाकीचे एकूण कर्जाशी प्रमाण	११.२१%	७.८६%	५.६४%	४.३३%	५.४१%
१०	प्रति कर्मचारी व्यवसाय (रुपये लाखांत)	३९३.८०	४०४.८७	४२६.०२	४५०.०४	५३०.२१
११	प्रति कर्मचारी नफा (रुपये लाखांत)	०.२५	१.९८	२.०६	१.९३	०.६५

तंत्रज्ञान आणि ग्राहक सेवा :

बँकिंग क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेता, या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ग्राहकांसाठी digital Platform व्दारे सुरु केलेल्या विविध योजनांमुळे ग्राहक संख्येत वाढ होत आहे. ग्राहकांसाठी सुरु केलेल्या UPI सेवेस ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद लाभत असून, या प्रणाली अंतर्गत व्यवहारांची संख्या दरमहा २ लाखांपेक्षा जास्त होत आहे. बँकेचे सर्व व्यवहार आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे बँकेचा सर्व डेटा सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी बँकेने Cloud Computing तंत्रज्ञान करार पध्दतीने घेतले असून, त्यायोगे बँकेचा डेटा सुरक्षित केला आहे. शाखानिहाय ग्राहकसेवेच्या वेळा, शाखांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक अहवालात नोंदविलेले आहेत. रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी पारित केलेल्या परिपत्रकांनुसार Cyber Security Framework अंतर्गत आवश्यक पूर्तता केली जात असून, यामध्ये होणारे बदल अद्ययावत केले जात आहेत. ग्राहकसेवेसंदर्भात रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचे पालन करण्यात येत आहे. बँकेसमोर तंत्रज्ञानाविषयी येणारे सर्व प्रश्न त्वरीत सोडविण्यासाठी याविषयातील तज्ज्ञ श्री. किरण पाटोळे यांची तंत्रज्ञान सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. ग्राहकसेवेची गुणवत्ता तपासण्यासाठी ग्राहकसेवा समिती असून, सदर समिती दर ३ महिन्यांनी आढावा घेते.

विमा व्यवसाय :

आपली बँक युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी आणि एस.बी.आय. लाईफ इन्शुरन्स कंपनी यांची कॉर्पोरेट एजंट म्हणून काम करीत असल्याने ग्राहकांच्या मालमत्तेचा (मशिनरी, वाहन, इमारत, इत्यादीचा) विमा तसेच, जीवनविमा उतरविणे सुलभ झाले आहे व त्यायोगे बँकेस चांगले उत्पन्न मिळत आहे. अहवाल सालात बँकेस विमा व्यवसायातून रुपये ०.३७ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे. या व्यवसायामुळे भविष्यात बँकेच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल. व्याजेतर उत्पन्नात वाढ व्हावी या उद्देशाने मागील वर्षी बँकेने विमा व्यवसायासाठी एस.बी.आय. लाईफ या कंपनीबरोबर करार केला आहे, तसेच, नुकताच श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनी यांचेबरोबरसुध्दा विमा व्यवसायासाठी करार केला आहे. या कंपन्यांच्या विविध पॉलिसीज विकण्याबरोबरच बँकेच्या कर्जदारांची विमा पॉलिसीही काढण्यात येत आहे.

प्रशिक्षण :

बँकेने वर्षभराचा प्रशिक्षणाचा आराखडा तयार केला असून, बँकेच्या दैनंदिन कामकाजात अचूकता यावी यासाठी कर्मचाऱ्यांचे अंतर्गत प्रशिक्षणसुध्दा आयोजित करण्यात येत आहे. बँकेतील वरिष्ठ अधिकारी सर्व कर्मचाऱ्यांना विविध विषयांवर प्रशिक्षण देत आहेत. यामुळे दैनंदिन कामकाजात येणा–या अडचणी, प्रश्न त्वरीत सोडविण्याचा प्रयत्न करीत आहोत. याबरोबरच, काही कर्मचाऱ्यांना पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन व नायबर या संस्थांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये पाठविले जात आहे. यावर्षीसुध्दा १००% कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. रिझर्व्ह बँकेची परिपत्रके, नियमांत सतत होणारे बदल याची संचालक मंडळाला माहिती व्हावी, यासाठी संचालक मंडळासाठीसुध्दा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कर्मचारी वर्ग :

कालपरत्वे बँकेतील ज्येष्ठ कर्मचाऱ्यांची जागा तरुण कर्मचाऱ्यांनी घेतली असून, सदर कर्मचारी समाधानकारक काम करीत आहेत. सदर कर्मचाऱ्यांना तुलनेने तंत्रज्ञानाचे चांगली जाण असल्याने, दैनंदिन काम शिकणे सोपे झाले आहे. यासाठी, त्यांना वर्षभर विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचे काम व्यवस्थापन करीत आहे. नवीन कर्मचारी बँकेच्या दैनंदिन कामकाजात आणि प्रशिक्षणात उत्साहाने सहभाग घेत असून, बदलत्या बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हाने पेलण्याचा प्रयत्न करीत आहेत. व्यवस्थापन व कर्मचारी वर्ग यांचा एकमेकांत उत्तम समन्वय असल्याने यावर्षी सुध्दा व्यवसायामध्ये चांगली वाढ होउन बँकेने व्यवसायाचा रुपये ४०० कोटींचा टप्पा पार केला आहे. सध्याच्या बँकिंग स्पर्धेस तोंड देत, बँकेचा व्यवसाय सांभाळणे आणि तो वाढविणे यासाठी संचालक मंडळ, बँकेचे अधिकारी, कर्मचारी एकजुटीने प्रयत्न करीत आहेत. शाखा व्यवस्थापक व अधिकाऱ्यांच्या नियमित बैठका होत असून, यात व्यवसायवाढीच्या प्रयत्नांचा आढावा, तसेच, एन.पी.ए. चे प्रमाण कमी करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे व त्यायोगे नफा वाढविणे याकडे लक्ष दिले जात आहे. संचालक मंडळ सदस्यांचे यासाठी मार्गदर्शन घेतले जात आहे. ग्राहकांच्या बँकिंग क्षेत्राकडून वाढत्या अपेक्षा याबरोबरच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची बंधने व धोरणे यांमुळे बँकिंग व्यवसाय करण्याचे आव्हान बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्ग प्रयत्नपूर्वक पेलत आहे, असेच म्हणावे लागेल.

सामाजिक उपक्रम :

पुणे शहर व जिल्ह्यात अनेक वर्ष कार्यरत असलेली स्व–रुप वर्धिनी या संस्थेस यावर्षीचा संपदा समाजकल्याण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून शि.प्र.मंडळी या संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्री. एस.के.जैन आणि प्रमुख वक्ते म्हणून भारत भारती संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष श्री. विनयजी पत्राळे उपस्थित होते.

अहवाल सालात बँकेच्या सभासदांनी बँकेकडे आर्थिक साहाय्य मिळणेसाठी केलेल्या विनंती अर्जानुसार, त्यांना सभासद कल्याण निधी मधून रुपये १०,०००/– चे आर्थिक साहाय्य देण्यात आले. पूरग्रस्तांसाठी सेवाभारती संस्थेस बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी यांच्यातर्फे एकत्रित रुपये २,००,०००/– अर्थसाहाय्य करण्यात आले.

शिरवळ शाखेचे खातेदार प्रगती विद्यालयातील २०० गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनींना सेवा–सहयोग संस्था आणि संपदा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

महिला सक्षमीकरण :

सामाजिक बांधिलकीचे भान राखत, बँकेने खास कष्टकरी महिलांसाठी आत्मनिर्भर योजना तयार केली आहे. यामध्ये मुख्यतः भाजीपाला विक्री, फूल विक्री, स्वतःची खानावळ, ब्युटी पार्लर, पापड लोणची विक्री, दुग्ध व्यवसाय, स्टेशनरी व्यवसाय, गोळ्या बिस्कीटे विकणे, साड्या व इतर कपडे विक्री, टेलरिंग, इत्यादी असे छोटे व घरगुती व्यवसाय करणा–या महिला तसेच, इतर लोकांकडे घरकाम करुन स्वाभिमानाने जगणा–या महिलांना त्यांच्या व्यवसायासाठी मदत करणे आणि त्यांना सक्षम बनविणे, हा उद्देश केंद्रस्थानी ठेऊन, बँकेने त्यांच्यासाठी प्रत्येकी जास्तीत जास्त रुपये १.०० लाखांची, कमी व्याजदराची आत्मनिर्भर वैयक्तिक कर्ज योजना आखली आहे. या योजेनेअंतर्गत बँकेच्या विविध शाखांमार्फत हे कर्जवितरण होत आहे. आर्थिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये २१६ महिलांना रुपये २१६.०० लाखांचे तर, त्यानंतर, पुढील तिमाहीमध्ये सुमारे ४७ महिलांना ४७.०० लाखांचे कर्ज वितरण बँकेने केले आहे.

समारोप :

वैधानिक लेखापरिक्षकांच्या सूचनेनुसार व बँकेच्या आर्थिक स्थैर्यासाठी व्यवस्थापनाने आवश्यक सर्व तरतुदी केल्या आहेत. सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांनी बँकेस **'अ'** वर्ग दिला आहे. जुन्या थकबाकीदार कर्जदारांकडून थकीत रकमा वसूल करण्याचे कामही चालू आहे. भविष्यात बँकेची अधिकाधिक प्रगती साधण्यासाठी संचालक मंडळ सदस्य व सर्व कर्मचारी वर्ग कटीबध्द आहेत.

आभार :

अहवाल सालात संचालक मंडळातील माझे सहकारी संचालक, सर्व कर्मचारी, बँकेचे भागधारक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक या सर्वांनी बँकेच्या प्रगतीसाठी मला दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे डेप्युटी गव्हर्नर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, चीफ जनरल मॅनेजर (सेंट्रल ऑफिस), चीफ जनरल मॅनेजर (रिजनल ऑफिस), मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. अप्पर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य (नागरी बँक), मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे जिल्हा, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक, लेखापरीक्षण, पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, हवेली विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक, मुंबई, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, पदाधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन, मुंबई यांचे पदाधिकारी, दि महाराष्ट्र अर्बन को. ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबई, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन व त्यांचे पदाधिकारी यांनी अहवाल वर्षात केलेल्या सहकार्याबद्दल बँक त्यांची आभारी आहे.

कन्करंट ऑडिटर मे. एस.एस.एस.एस. ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, अंतर्गत लेखापरीक्षक मे. सी.एम.आर.एस. ॲण्ड असोसिएटस्, एल.एल.पी., चार्टर्ड अकौंटंटस्, वैधानिक लेखापरीक्षक मे. एस.आर.पंडित ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस, मे. ए.जे. कन्सल्टंटस्, जी.एस्.टी. कन्सल्टंट, सायबर सिक्युरिटी ऑडिटर श्री. अजय निकुंभ यांनी अहवाल वर्षात केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणे डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणे या संस्थेचे पदाधिकारी यांनी अनेक प्रसंगी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

आपल्यासमोर ठेवलेला ५२ वा वार्षिक अहवाल आपण स्वीकृत करावा, अशी विनंती आहे.

सी.ई. अश्विनीकुमार उपाध्ये
अध्यक्ष
संपदा सहकारी बँक लि., पुणे

दिनांक : २७ जुलै, २०२६

INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,

The Members,

Sampada Sahakari Bank Limited, Pune

Report on the Audit of the Financial Statements

1. Opinion

We have audited the accompanying financial statements of Sampada Sahakari Bank Limited, Pune, (hereinafter referred to as "the Bank") as on 31 March 2026, which comprise the Balance Sheet as at 31st March 2026, and the Profit and Loss Account, and the Cash Flow Statement for the year then ended, and notes to the financial statement including a summary of significant accounting policies and other explanatory information (hereinafter referred to as "the financial statements"). The returns of 8 branches audited by us are incorporated in these financial statements.

CD.

1. In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements give the information required by the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules thereunder and Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative Societies) as amended by the Banking Regulation (Amendment) Act, 2020 and the guidelines issued by the Reserve Bank of India (RBI), in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India :-

a. In the case of Balance Sheet of the state of affairs of the Bank as at 31st March 2026.

b. In case of Profit and Loss Account, of the profit for the year ended on that date; and

c. In the case of the Cash Flow Statement, of the cash flow for the year ended on that date.

2. Basis of Opinion

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing ("the SAs") issued by the Institute of Chartered Accountants of India ("The ICAI"). Our responsibilities under those SAs are further described in the "Auditor's Responsibilities for the audit of the Financial Statements" section of our report. We are independent of the Bank in accordance with the Code of Ethics issued by the Institute of Chartered Accountants of India together with ethical requirements that are relevant to our audit of the financial statements under the provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules thereunder and Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative Societies) as amended by the Banking Regulation (Amendment) Act, 2020 and the guidelines issued by the Reserve Bank of India (RBI) and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements and the Code of Ethics issued by the ICAI. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

3. Information Other than the Financial Statements and Auditor's Report thereon

The Management and Board of Directors are responsible for the preparation of the other information. The other information comprises the information included in the Bank's Annual Report, including other explanatory information, but does not include the financial statements and our auditor's report thereon. The Annual report is expected to be made available to us after the date of this auditor's report.

Our opinion on the financial statements does not cover the Other Information and we do not express any form of assurance conclusion thereon.

In connection with our audit of the financial statements, our responsibility is to read the other information identified above when it becomes available and, in doing so, consider whether the other information is materially inconsistent with the financial statements or our knowledge obtained or otherwise appears to materially misstated. When we read the Annual Report including other explanatory information, if, we conclude that there is a material misstatement therein, we are required to communicate the matter to those charged with governance

4. Responsibilities of Management and those charged with Governance for the Financial Statements

The Bank's Management and Board of directors are responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the accounting principles generally accepted in India, including the Accounting Standards issued by the ICAI. This responsibility also included maintenance of adequate accounting record in accordance with Provisions of Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules thereunder and Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co Operative Societies) as amended by the Banking Regulation (Amendment) Act, 2020, and the guidelines issued by the Reserve Bank of India (RBI), for safeguarding of the assets of the bank and for preventing and detecting frauds and other irregularities, selection and application of appropriate accounting policies making judgments estimates that are reasonable and prudent; and design, implementation and maintenance of adequate internal financial controls, that were operating effectively for insuring the accuracy and completeness of accounting records relevant to preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

5. Auditor's Responsibility for the audit of the Financial Statements

1. Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but is not a guarantee that an audit conducted in accordance with Standards on Auditing will always detect a material misstatement when it exists. Misstatements can arise from fraud or error and are considered material if, individually or in the aggregate, they could reasonably be expected to influence the economic decisions of users taken on the basis of these financial statements.

As part of an audit in accordance with the SAs, we exercise professional judgment and maintain professional skepticism throughout the audit. We also:

- Identify and assess the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error, design and perform audit procedures responsive to those risks, and obtain audit evidence that is sufficient and appropriate to provide a basis for our opinion. The risk of not detecting a material misstatement resulting from fraud is higher than for one resulting from error, as fraud may involve collusion, forgery, intentional omissions, misrepresentations, or the override of internal control.
- Obtain an understanding of internal control relevant to the audit in order to design audit procedures that are appropriate in the circumstances but not for the purpose of expressing an opinion on the effectiveness of the entity's internal control.

- Evaluate the appropriateness of accounting policies used and the reasonableness of accounting estimates and related disclosures made by the management.
- Conclude on the appropriateness of management's use of going concern basis of accounting and, based on the audit evidence obtained, whether a material uncertainty exists related to events or conditions that may cast significant doubt on the ability of the Bank to continue as a going concern. If we conclude that a material uncertainty exists, we are required to draw attention in our auditor's report to the related disclosures in the financial statements or, if such disclosures are inadequate, to modify our opinion. Our conclusions are based on the audit evidence obtained up to the date of our auditor's report. However, future events or conditions may cause the Bank to cease to continue as a going concern.
- Evaluate the overall presentation, structure and content of the financial statements, including the disclosures, and whether the financial statements represent the underlying transactions and events in a manner that achieves fair presentation.

We communicate with those charged with governance regarding, among other matters, the planned scope and timing of the audit and significant audit findings, including any significant deficiencies in internal control that we identify during our audit.

We also provide those charged with governance with a statement that we have complied with relevant ethical requirements regarding independence, and to communicate with them all relationships and other matters that may reasonably be thought to bear on our independence, and where applicable, related safeguards.

6. Other Matters

The financial statements of the Bank for previous year ended March 31st, 2025 were audited by M/S Prakash G. Pathak & Company, Chartered Accountants and had expressed an unmodified opinion vide their report dated 25.04.2025 on such financial statement. This report has been relied upon for the purpose of the audit of the financial statement. Our opinion is not modified in respect of these matters.

7. Report on Other Legal and Regulatory Requirements

The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Forms A and B respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and rules thereunder.

As required by Rule 69(4) of Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Banking Regulation Act, 1949 (as applicable to Co-operative Societies) as amended by the Banking Regulation (Amendment) Act, 2020.

We report that:

a. We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory;

b. In our opinion, proper books of account as required by the said Acts, Rules framed thereunder and the Bye-laws have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches and offices;

c. The transactions of the Bank which came to our notice have been within the powers of the Bank;

d. The Balance Sheet, the Profit and Loss Account and the Cash Flow Statement dealt with by this

report, agree with the books of account and the returns;

e. The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Bank;

f. In our opinion and according to information and explanations given to us, we have not noticed any material impropriety or irregularity in the expenditure or in the realization of money due to the Bank.

As required by Rule 69(6) of the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 and subject to our comments in LFAR and annexures thereto, we report that:

a. During course of audit, we have generally not come across transactions which appear to be contrary to the provisions of Act, Rules or the Bye-laws of the bank;

b. During course of audit, we have generally not come across such transactions which appear to be contrary to the provisions of Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Rules framed thereunder.

c. There is no material impropriety or irregularity in the expenditure or in the realization of moneys due to the bank;

d. To the best of our knowledge, no other matters have been specified by the Registrar of Co-op Societies, which require reporting under this Rule.

e. For the FY 2025-26, Bank is awarded with "**A**" classifications.

For S R Pandit & Co.
Chartered Accountants
Registration. No. 107309W
MCS Panel No- 18048

CA Sudhir Pandit
(Partner)
Mem. No. 032121
UDIN:- 26032121PRABJF2040

Place : Pune
Date : 06/06/2026

दिनांक ३१ मार्च, २०२६

३१ मार्च, २०२५	भांडवल व देणी	परिशिष्ट	३१ मार्च, २०२६
१०,००,००,०००.००	अधिकृत भागभांडवल		**१०,००,००,०००.००**
५,९२,५१,६२५.००	**१.** वसूल भागभांडवल	१	६,३८,५३,९२५.००
२८,८२,९७,३३५.५८	**२.** विधीविहीत गंगाजळी व इतर निधी	२	३०,३६,२१,४८३.२९
०.००	**३.** शासनाच्या प्रमुख अथवा सहाय्यकारी निधीसाठी देणे		०.००
२,१४,९५,५७,६६५.४९	**४.** ठेवी व अन्य खाती	३	२,५०,७२,९८,७१७.२७
०.००	**५.** कर्ज (अन्य सहकारी बँकेकडून)		०.००
०.००	**६.** वसुलीस स्वीकारलेली बिले (दुबेरजी)		०.००
०.००	**७.** शाखांतर्गत खाती जुळणी		०.००
